महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/न.क्र.३७/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcr@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५३४ दिनांक ०४/०४/२०१६

**विषय** :- शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (इएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भ** :- १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९५ दि. ३१/०७/२०१४.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५०४ दि. ०७/०४/२०१५.
३) शासन शुध्दीपत्रक क्र. बीसीसी-२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दि. ०२/१२/२०१५.

--------------------

शासनाने सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. XIII व XIV दि. ०९ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागासवर्ग (इएसबीसी) व विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी-ए.) निर्माण करुन सदर अद्यादेशानुसार, सरळसेवा भरतीमध्ये इ.एस.बी.सी. प्रवर्गाकरिता १६% व एस.बी.सी.-ए प्रवर्गाकरिता ५% आरक्षण विहीत करण्यात आले आहे. शासन निर्णय क्र. बी.सी.सी.१०९७/प्र.क्र.२/९७/१६ब दि. २९/०३/१९९७ अन्वये विहीत केलल्या बिंदू नामावलीमध्ये सुधारणा करुन सरळसेवा भरतीच्या पदासंदर्भात सुधारीत बिंदू नामावली विहीत केल्याबाबत या कार्यालयाचे संदर्भ क्र. १ वरील प्रशासकीय परिपत्रकान्वये प्रसारीत करण्यात आले आहे.

२. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. १४/११/२०१४ च्या आदेशान्वये, अद्यादेश क्र. XIV दि. ९ जुलै २०१४ मधील, कलम ४ (१) मधील, राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवा मधील, सरळसेवा प्रवेश नियुक्त्यांमधील, ५% नियुक्त्या विमाप्र-अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिलेली आहे. परंतु सदर अद्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे तो दि. २३/१२/२०१४ रोजी व्यपगत झाला असून, शासन निर्णय क्र. बीसीसी/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब दि. ०२/०३/२०१५ अन्वये प्रसारीत करण्यात आला आहे. तसेच इ.एस.बी.सी. आरक्षणा बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दि. २१/०२/२०१५ अन्वये सदर निर्णयाची अंमलबजावणी दि. १४/११/२०१४ पासून स्थगित करण्यात आली असून या कार्यालयाचे संदर्भ क्र. २ वरील प्रशासकीय परिपत्रकान्वये प्रसारीत करण्यात आले आहे.

३. शासन शुध्दीपत्रक क्र. बीसीसी-२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब दि. ०२/१२/२०१५ ची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर शुध्दीपत्रका अन्वये शासनाने खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

अ ) सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २१/०२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील अनु.क्र. 'प' येथे नमूद सूचना वगळण्यात येत आहेत.

ब) शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास शासकीय/निमशासकीय सेवा (सरळसेवा भरतीसाठी) व शैक्षणिक संस्थांमध्ये १६% आरक्षण देण्याबाबतच्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १/२०१५ या अधिनियमाची अंमलबजावणी मा. उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत स्थगित करण्यात येत आहेत. सदर स्थगितीमुळे शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरिता दि. ०९ जुलै २०१४ पुर्वीच्या प्रचलित आदेशानुसार विहीत केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करुन पदे भरण्याची कार्यवाही करावी.

क) शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी, दि. १४/११/२०१४ पुर्वी शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदावर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधुन तात्पुरत्या स्वरुपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता तदर्थ स्वरुपात नेमणुका करण्यात याव्यात.

ड) उपरोक्त नेमणुका या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. ३१५१/२०१४ श्री. संजीत शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येतील, ही बाब संबंधितांच्या नियुक्त आदेशात स्पष्टपणे नमूद करावी.

४. या अनुषंगाने सर्व संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यांना सूचीत करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यामधील आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. अवलोकनार्थ शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

(सदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

D:\BCR1 NEW\Other File\Circular\SBC-A Circular.doc

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ७ एप्रिल, २०१५ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २ डिसेंबर , २०१५.

वाचा:-

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि.१५ जुलै,२०१४.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२४.७.२०१४.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२१.२.२०१५.
५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, ( महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ )

प्रस्तावना :-

महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ या अध्यादेशाविरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून, उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ४ येथे नमूद केलेल्या दिनांक २१.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. तथापि,** महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ चे कायदयात रूपांतर होऊन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ ) अस्तित्वात आला आहे. सदर अधिनियमास याचिका कर्त्यांनी रिट याचिका क्रमांक ३१५१/२०१४ अन्वये आव्हान केले आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७.४.२०१५ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमास स्थगिती दिलेली आहे

व त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता, या विभागाच्या दिनांक २१.२.२०१५ च्या आदेशात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन शुध्दिपत्रक :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३१५१/२०१४ या प्रकरणी दि.७.४.२०१५ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अ) सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.४ येथील दिनांक २१.२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील अनुक्रमांक **"प)"** येथे नमूद सुचना वगळण्यात येत आहेत.

आ) शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास शासकीय/निमशासकीय सेवा (सरळसेवा भरतीसाठी ) व शैक्षणिक संस्थांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याबाबतच्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमाची अंमलबजावणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत स्थगित करण्यात येत आहे. सदर स्थगितीमुळे शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरिता दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच्या प्रचलित आदेशांनुसार विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करून पदे भरण्याची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक संस्थामधील प्रवेश पूर्वीच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सुरु राहतील.

इ) शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता, तदर्थ स्वरूपात नेमणुका करण्यात याव्यात.

ई) उपरोक्त नेमणुका या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३१५१/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येतील,ही बाब संबंधितांच्या नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करावी.

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत व सदर आदेशाची संबंधित प्रशासकिय विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी.

३. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत वरीलप्रमाणे शासन निर्णयाचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ, ३८७८/२०१५, दिनांक १४.०८.२०१५ , विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८२१/२०१५ दिनांक ०९.०९.२०१५ आणि अनौपचारिक संदर्भ क्र. ११२४/२०१५ दिनांक २४.११.२०१५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५१२०२१७५८१६६८०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c8191e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2015.12.02 17:54:46 +05'30'

**( टि. वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) मा. सभापती,विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा. अध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
५) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
६) राज्यपाल यांचे सचिव,
७) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
८) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
९) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
१०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
११) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१२) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१५) सर्व जिल्हाधिकारी,
१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१९) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२०) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२३) सचिव,राज्य माहिती आयोग,
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२५) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२६) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२७) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२८) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२९) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
३०) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
३१) संचालक, सेवायोजन, मुंबई,
३२) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३३) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३६) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३७) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३९) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
४०) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********